स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा http://epaper.beedvastav.com

# रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्यातील एजंटचा यु टर्न! म्हणे, ज्या अधिकाऱ्यांना मी नोटांची बंडल दिली ते घरी जातील!!

शेतकरी माझ्याकडे येतात मी शेतकऱ्यांकडे जात नाही, तेव्हा बोजा पडला तर तो त्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर पडेल त्याला मी काय करू?

उसने अवसान आणणारा एजंट आता म्हणू लागला, बातम्या आल्यामुळे वातावरण तापले! थंड झाले की, पुन्हा जोमाने कामाला लागू!

पाटोदा एसडीएम ऑफिसमधील त्या डबल ढोलकी कर्मचाऱ्याला संबंधित एजंटने आणले गोत्यात, लवकरच भांडाफोड!!

## धाब्यांवर बैठका घेणारा एजंट आता रानावनात अधिकाऱ्यांना घेऊन बसू लागला!!

बीड : प्रतिनिधी

बातम्या छापून आल्याने काहीच होत नाही असे एकीकडे ग्रामस्थांना सांगायचे आणि चेहऱ्यावर तसा अविर्भावही आणायचा. तर दुसरीकडे बातम्यांमुळे वातावरण बिघडले आहे, शांत होईपर्यंत थांबू, असा सावधगिरीचा पवित्रा अधिकाऱ्यांना सांगणाऱ्या एजंटची पूरती दानादान उडाली आहे. एकूणच दैनिक 'वास्तव'मध्ये या संदर्भात बातम्या प्रकाशित झाल्यामुळे एजंटसह संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या अक्षरशः झोपा उडाल्या आहेत. रेल्वेचा एक कर्मचारी तर सतत नशेत तर्र असतो. हा तोच कर्मचारी आहे, जो की, साखर कारखाना उभारणीची भाषा करीत होता. दैनिक 'वास्तव'णे संबंधित एजंटची सगळी हवा काढून घेतल्यानंतर हा एजंट आता पूर्वीप्रमाणे राजरोसपणे धाब्यांवर बैठका घ्यायचा पण आता याला लपून-छपून दुसऱ्यांच्या रानावनात बैठका घेण्याची वेळ आली आहे. लवकरच 'वास्तव'कडे या अनुषंगाने अधिकृत माहिती येणार असून या प्रकरणाचा मोठा बॉम्बस्फोट होणार आहे. दरम्यान सदरील एजंटच्या तंबूत घबराट झाल्याने स्वतःवर येणारे बालंट आता संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आणि शेतकऱ्यांवर ढकलून देताना ऐकवास मिळत आहे. तो एजंट म्हणतो, अधिकाऱ्यांनी माझ्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन काम केले आहे. तेव्हा अडकले तर ते अधिकारी अडकतील आणि शेतकऱ्यांच्या जमिनीवर बोजा पडेल, त्यात माझे काहीही नुकसान होणार नाही.



### ➤ पाटोदा एसडीएम ऑफिसमधील तो कर्मचारी आता रडारवर!!

● पाटोदा एसडीएम कार्यालयातील सर्व बारीक–सारीक माहिती या एजंटला पुरवणारा तो कर्मचारी आता दैनिक 'वास्तव'च्या रडारवर आला आहे. हा चापलूसी करणारा कर्मचारी अधिकाऱ्यांकडून अनावधानाने एखादी चूक झाली तर या चुका संबंधित एजंटला सांगतो. आणि हा एजंट या चुकांवर बोट ठेवून अधिकाऱ्यांकडून त्याला हवे असलेले काम करवून घेतो. मग कधी पैसे देऊन तर कधी आ. धनंजय मुंडे, आ. सुरेश धस अशा नेत्यांची नावे घेऊन दबाव टाकतो, अशी माहिती 'वास्तव'कडे आली आहे. एसडीएम ऑफिसमधील हा चोर पंक्चर असलेला कर्मचारी डबल ढोलकीप्रमाणे शासनाचाही पगार घेतो आणि एजंट कडूनही पैसे घेऊन त्याचे काम करतो. सदरील चोर पंक्चरची अधिकृत माहिती दोन दिवसात 'वास्तव'कडे येणार असून या डबल ढोलकीपट्टूचा खरा चेहरा पाटोदा तालुक्यातील जनते समोर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर उघडा पडणार आहे.

### 'कशात न बशात चिलट तमाशात' अशा एका व्यक्तीने दैनिक 'वास्तव'ला केला फोन!!

●शिरूरहून बोलतोय अन्नांचा कार्यकर्ता आहे तर कधी पीए आहे म्हणून सांगतो. याबाबतची शहनिशा केली असता हा आमदार सुरेश धस यांचा पीए नसून तो बांधकाम विभागातील कार्यकर्त्यांच्या फाईल एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर घेऊन जाणारा हा कार्यकर्ता असल्याची अधिकृत माहिती आहे. 'कशात न बशात चिलट तमाशात' म्हटल्याप्रमाणे अशा कार्यकर्त्यांची आमदार सुरेश धस यांनी तात्काळ कान उघडणी करणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात अशा कार्यकर्त्यांमुळे आमदार सुरेश धस यांना अडचणी आल्याशिवाय राहणार नाहीत. मी आमदार सुरेश धस यांचा पीए असून बीडचे काम पाहतो, अशी थाप त्याने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना मारायला हवी होती. परंतु, त्याने थेट दैनिक 'वास्तव'ला अशी थाप मारली आणि उघडा पडला. विशेष म्हणजे हा थाप मारणारा कार्यकर्ता रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्यातील एजंटच्या जवळचा असल्याचे सांगितले जात आहे.

### अंगलट येण्याचा अंदाज दिसताच एजंने यू टर्न घेतला! माझे नुकसान होणार नाही, अधिकारी घरी जातील!!

●आष्टी, पाटोदा आणि बीड तालुक्यातील रेल्वे भूसंपादन मावेजामध्ये महाघोटाळा झाल्याचे अनेक बाबींवरून निदर्शनास येत आहे. जर या प्रकरणात सॅटलाईट द्वारे पाहणी केली तर ज्या लोभी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात फळझाडे नसताना देखील फळझाडे दाखवून कोट्यावधी रुपयांना शासनाला कसा गंडा घातला आहे हे उघडकीस यायला वेळ लागणार नाही. दरम्यान या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर लढा देण्याचे काम सुरू आहे. आणि लवकरच याबाबतचा सॅटॅलाइट अहवाल दैनिक 'वास्तव'ला मिळणार आहे. दैनिक वास्तव मध्ये या अनुषंगाने प्रकाशित झालेल्या बातम्यांमुळे संपूर्ण बीड जिल्ह्याला रेल्वे भूसंपादन माव्याचा महाघोटा कसा झाला आहे याची माहिती मिळाली आहे.

●यामुळे पायाखालची जमीन सरकलेल्या एजंटची आता बोबडी वळाली आहे. तो म्हणतो या प्रकरणात चौकशी झाली आणि सत्य बाहेर आले तरीही यामध्ये माझे काहीही नुकसान होणार नाही. ज्या अधिकाऱ्यांनी माझ्याकडून पैसे घेवून हि कामे केली ते घरी जातील आणि ज्या शेतकऱ्यांनी खोटी माहिती दिली त्यांच्या जमिनींवर बोजा पडेल. अशाप्रकारे आता या एजंट यु टर्न घेतला आहे.

## रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्यात फौजी, रिटायर्ड फौजी, शिक्षक, कर्मचारी लाभधारक?

●रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्यातील त्या एजंटने फौजी, रिटायर्ड फौजी, शिक्षक, कर्मचारी अशा शेतकऱ्यांच्या शेतात फळ झाडे नसताना ती झाडे आहेत असे थेट पंचनामे करून शासनाला कोट्यावधी रुपयांचा गंडा घातला असल्याची माहिती सांगितली जात आहे.

●विशेष म्हणजे या भागातील ज्या शेतकऱ्यांनी त्या एजंटशी संपर्क साधला नाही त्यांना मात्र मोठा मावेजा मिळाल्या शेतकऱ्यांच्या शेजारीच शेत जमीन असताना त्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे मावेजा मिळाला, आणि त्या एजंट मार्फत गेलेल्या शेतकऱ्यांना मात्र कोटींनी रुपये मिळाले आहेत. ●ही तफावत पाहता यामध्ये सरळ सरळ शासनाला कोट्यावधी रुपयांचा गंडा घातल्याचे निष्पन्न होत आहे. शासनाला कोट्यावधींचा गंडा घालणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये फौजी, रिटायर्ड फौजी, काही शिक्षक, काही कर्मचारी यांचा मोठ्या प्रमाणात भरणा असल्याचे बोलले जात आहे.

उद्याच्या अंकात

**याप्रकरणात पैसे घेणाऱ्या अधिकाऱ्यांना अंगावर घालण्याचा डाव दैनिक 'वास्तव'ने हाणून पाडला!! तत्कालीन जिल्हा कृषी अधिकारी जेजुरकर यांना कसे छळले? खोटे बोलून कोणत्या नेत्यांना अंगावर घातले?**

कौतुकास्पद भूमिका ➤ वर्षानुवर्षी दुर्लक्षित असलेल्या धानोरा रोडला मिळालं अंतिम यश!!

## आम्रपाली साबळेंच्या धैर्यामुळे टळला अनर्थ!





➤शहरातील धानोर रोडचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला असून, या ऐतिहासिक टप्प्यावर सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे यांनी बजावलेली भूमिका कौतुकास्पद ठरली आहे.

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून या रस्त्यासाठी निधी मंजूर झाला होता. मात्र मावेजा प्रकरण, न्यायालयीन वाद आणि काही तक्रारदारांच्या अडथळ्यांमुळे काम वारंवार थांबत होते. काही दिवसांपूर्वी पुन्हा रस्ता अडवण्यात आल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती .याच वेळी सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे यांनी पुढाकार घेत तीन दिवस सतत या परिसरात लक्ष ठेवले. प्रशासन, पोलीस आणि स्थानिक नागरिक यांच्यात समन्वय साधत त्यांनी सर्वांची समजूत काढण्याचे काम केले.

शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पीआय बांगर यांच्याशी संपर्क साधून योग्य बंदोबस्त लावण्यात आला. न्यायालयाच्या आदेशानुसार आणि प्रशासनाच्या मदतीने रस्त्याचे काम शांततेत पुढे सुरू झाले.

विशेष म्हणजे, शेकडो लोकांच्या उपस्थितीत एकटी महिला म्हणून आम्रपाली साबळे ठामपणे उभ्या राहिल्या. कुठलाही वाद, गोंधळ किंवा लाठीचार्ज न होता त्यांनी सर्व बाजूंना शांत करून मार्ग काढला. मावेजा मिळालेल्या नागरिकांनाही त्यांनी संयमाने समजावले. त्यांच्या धैर्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले.

आज आम्रपाली साबळे या केवळ एक सामाजिक कार्यकर्त्या नसून, प्रशासन आणि जनतेमधील एक मजबूत दुवा ठरल्या आहेत. महिलाही समाजासाठी किती मोठे कार्य करू शकतात, याचा जिवंत आदर्श त्यांनी घालून दिला आहे.

धानोर रोडच्या शेवटच्या टप्प्यातील यशामागे आम्रपाली साबळेंचे योगदान अमूल्य असून, त्यांच्या या कार्यामुळे संपूर्ण परिसरात त्यांच्याविषयी आदरभाव निर्माण झाला आहे.

त्यांचे हे कार्य इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. धैर्य, संयम, संवाद आणि समाजहित यांचा संगम म्हणजे आम्रपाली साबळे आहेत, हे त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे

## राज्यातील ९ महानगरपालिकांना मिळाले महापौर

### भाजपची सरशी; मुंबईचा प्रथम नागरिक कोण हे उद्या स्पष्ट होणार




➤मुंबई : राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये आज महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत भाजप–महायुतीने स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र दिसून आले. जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी–चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर, नाशिक आणि अहिल्यानगर या महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये महापौर निवडी पूर्ण झाल्या असून काही ठिकाणी चुरशीच्या वाटणाऱ्या लढती अखेर बिनविरोध झाल्या, तर काही ठिकाणी भाजपने मोठ्या●

पान ३ वर...

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# बीडची भावना ठरलेल्या चंपावती महोत्सवास गरज पडल्यास शिवसंग्रामचा खंबीर पाठिंबा- ज्योतीताई मेटे

## कलेचा वारसा पुढे नेण्यासाठी चंपावती महोत्सव अविरत सुरू ठेवणार- अनिलदादा जगताप

**बीड : प्रतिनिधी**

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध कला प्रकारांचे एकत्रीकरण असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेची सध्या बीड जिल्ह्यात सकारात्मक चर्चा सुरू आहे. या महोत्सवामागे कलेसाठीची निष्ठा, बालकलाकारांच्या प्रोत्साहनाची धडपड आणि बीडच्या समृद्ध कलाक्षेत्रासाठी असलेली तळमळ स्पष्टपणे दिसून येत आहे. बीड रंगभूमीवर अनिलदादा जगताप यांनी उभारलेला चंपावती महोत्सव अल्पावधीतच बीड जिल्ह्याची भावना बनला असून, दरवर्षी हजारो बालकलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग या महोत्सवात पाहायला मिळत आहे. चंपावती महोत्सवासाठी जेव्हा कधी योगदान देण्याची वेळ येईल, तेव्हा शिवसंग्राम पक्ष खंबीरपणे पाठीशी उभा राहील, असे प्रतिपादन शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योतीताई मेटे यांनी चंपावती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या उद्घाटन समारंभात केले.

काल दि. 5 फेब्रुवारी 2025 रोजी समूह नृत्य व जोडी नृत्य स्पर्धांच्या उद्घाटनासाठी ज्योतीताई मेटे उपस्थित होत्या. यावेळी डीपीआय राज्याध्यक्ष अजिंक्य चांदणे, गटशिक्षणाधिकारी समदंर खान, एबीपी माझाचे





प्रतिनिधी विकास माने यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. सर्व मान्यवरांचा स्वागत व सत्कार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

यावेळी बोलताना अनिलदादा जगताप म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडचे कलाक्षेत्र अधिक समृद्ध व्हावे या उद्देशाने चंपावती महोत्सवाची सुरुवात करण्यात आली असून, कलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हा महोत्सव अविरत सुरू ठेवला जाईल.

यावेळी अजिंक्य चांदणे, समदंर खान, विकास माने, संदेश लोळगे यांनीही चंपावती महोत्सव बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रासाठी सक्षम व प्रेरणादायी व्यासपीठ ठरत असल्याचे गौरवोद्गार काढत पुढील महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

काल दि. 5 रोजी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक अंतर्गत इयत्ता 4 थी ते 6 वी या गटातील समूह नृत्य व वैयक्तिक नृत्य स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांमध्ये 112 समूह नृत्य आणि 187 वैयक्तिक नृत्य सादरीकरणे झाली असून, बालकलाकारांनी प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली.

# लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध डॉ. गणेश ढवळे यांची निवड

लिंबागणेश : प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज गुरुवार, दिनांक ०५ रोजी सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी सभेत विविध विषयांचे सविस्तर वाचन करून ग्रामस्थांना माहिती दिली.

या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली, तर सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी त्यास अनुमोदन दिले. ग्रामस्थांनी एकमुखाने त्यांच्या नावाला पाठिंबा दिला.

निवडीनंतर सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत गावातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी यापूर्वी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी, गावातील शांतता, सलोखा आणि सौहार्द वाढविण्यासाठी डॉ. गणेश ढवळे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.




महाराष्ट्र शासनाने माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत, गावातील वाद–विवाद गावपातळीवरच सामोपचाराने मिटवण्यासाठी तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे किरकोळ वाद, जमीन वाद, कौटुंबिक तंटे तसेच इतर सामाजिक वाद पोलिस प्रशासन व ग्रामस्थांच्या सहभागातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या निवडीनंतर बोलताना डॉ. गणेश ढवळे यांनी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी दाखवलेला विश्वास सर्वांच्या सहकार्याने सार्थ करेन, अशी ग्वाही दिली. गावातील शांतता टिकवणे, तंटे कमी करणे आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे, शंकर वाणी, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अक्षय वाणी, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, मोहन कोटुळे, केशव गिरे, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहाय्यक अशोक लोखंडे, विष्णु गर्जे, आसराजी वीर, अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, यमुना आबदार, प्रतिक्षा शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोंगरी, मांडवी, मोहम्मद अली रोड परिसरात महापालिकेच्या या अधिकाऱ्याची घुसून कारवाई

## ... महापालिकेच्या नवख्या सहाय्यक आयुक्ताने मुंबईकरांची तोंडे केली गप

मुंबई : मुंबई महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार मुंबईतील काही विभागांमध्ये महापालिकेच्या वतीने अनधिकृत फेरीवाले आणि पदपथांवर करण्यात आलेल्या वाढीव बांधकामांवर कारवाई होत आहे. मात्र ही कारवाई होत असतानाच संपूर्ण मुंबईचे लक्ष ज्या कारवाईने वेधून घेतले आहे, ते आहे डोंगरी, मोहम्मद अली रोड येथील कारवाईने. या भागातील फेरीवाले आणि त्यांच्या अतिक्रमणावर कारवाई करण्याची हिंमत होत नव्हती. पण नवख्या सहाय्यक आयुक्त असलेल्या योगेश देसाई यांनी मुस्लिम बहुल विभागात ही धडक कारवाई करत महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त (शहर) यांचा विश्वास सार्थ ठरवला आहे. महापालिकेच्या या कारवाईमुळे डोंगरी, पायधुनीत जाऊन कारवाई करून दाखवा असे आव्हान देण्याची हिंमत जनतेची होणार नाही.

महापालिकेच्या बी विभागाच्या वतीने सलग चार दिवस कारवाई सुरू असून या कारवाईमध्ये फेरीवाल्यांसह त्यांची वाढीव बांधकामे ही जमीनदोस्त करण्यात आलेली आहे. महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्त यांचं पाठबळ असल्यास सहाय्यक आयुक्त काय करू शकतो हे नवख्या असलेल्या बी विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांनी करून दाखवले आहे. योगेश देसाई यांच्यासारख्या नवख्या सहाय्यक आयुक्तांना बी विभागाची दिल्याने प्रशासनावर तीव्र टीका झाली होती. या विभागात अनुभवी किंवा



विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची प्रभारी नियुक्ती करून जबाबदारी सोपवण्यात यावी असे म्हटले जात होते. पण नवख्या असलेल्या योगेश देसाई यांनी सहाय्यक आयुक्त पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बी विभागातील अनधिकृत बांधकामांची बजबजपुरी माजलेल्या या भागात ही कारवाई करून आपण एक सक्षम सहाय्यक आयुक्त आहोत हे दाखवून दिले आहे.

योगेश देसाई यांच्या चमूने २९ फेब्रुवारीपासून हाती घेतलेल्या या कारवाईत ५ मार्च पर्यंत सरदार वल्लभ भाई पटेल रोड. इब्राहिम मोहम्मद अली रोड, युसूफ मेहरली रोड, लोकमान्य टिळक रस्ता आधी ठिकाणी कारवाई करत २५ अनधिकृत स्टॉल, ४० वाढीव बांधकामे, १० बोलार्ड ग्रील तसेच ३५ फेरीवाल्यांवर कारवाई करतानाचा या भागात सखोल स्वच्छता मोहीम राबवून रस्ते आणि पदपथ साफ केले.

या विभागात यापूर्वी महापालिकेचे तत्कालीन सहायक आयुक्त उदयकुमार शिरूरकर यांनी अशाप्रकारे धडक कारवाईचा धडाका लावला होता. शिरूरकर हे महापालिकेचे अधिकारी होते आणि परीक्षा देत सहाय्यक आयुक्त बनले होते. त्यामुळे त्यांना महापालिकेच्या कामकाजाचा आणि कार्यपद्धती तसेच भौगोलिक परिस्थितीची कल्पना होती. पण योगेश देसाई यांच्यासारख्या नवख्या अधिकाऱ्याने या संवेदनशील विभागात सातत्यपूर्ण कारवाई करून आपण काही कमी नसल्याचे दाखवून दिले आहे.

कुर्ल्यातील घटनेनंतर मुंबईत फेरीवाले आणि त्यांच्या वाढीव बांधकामांवरोधात सुरू झालेल्या या कारवाईत बी विभागातील ही कारवाई जनतेचा महापालिकेवरील विश्वास वाढवताना दिसत आहे.

### मागील पाच ते सहा दिवसातील कारवाई

ठिकाण : इब्राहिम मोहम्मद अली रोड (नारायण धुरू स्ट्रीट मांडवी) सरदार वल्लभ भाई पटेल रोड ( ) इब्राहिम मोहम्मद मर्चंड रोड, मांडवी संत तुकाराम रोड, युसूफ मेहरली रोड, लोकमान्य टिळक रस्ता

कारवाई : स्टॉल्स :२५ वाढीव बांधकामे :४० बोलार्ड ग्रील :१० बेकायदेशीर फेरीवाले : ३५

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## महाराष्ट्रातील ७ राज्यसभा जागांची निवडणूक 'बिनविरोध' होणार? शरद पवारांच्या जागेवरही टांगती तलवार

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत विजयाचा फायदा आता महायुतीला राज्यसभेतही मिळणार आहे. येत्या एप्रिल महिन्यात राज्यातील ७ राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ संपत असून, विधानसभेतील नव्या संख्याबळानुसार महायुतीचे पारडे जड झाले आहे. भाजपचे सर्वाधिक १३७ आमदार निवडून आल्याने भाजपच्या वाट्याला ४ जागा, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ जागा मिळण्याची दाट शक्यता आहे. दुसरीकडे, विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा मोठा फटका महाविकास आघाडीला बसणार आहे. यापूर्वी महाविकास आघाडीच्या ताब्यात असलेल्या ३ जागा आता महायुतीच्या खात्यात जाण्याची चिन्हे आहेत. मविआतील प्रमुख पक्षांचे संख्याबळ कमी झाल्याने त्यांना ७ पैकी केवळ १ जागेवर समाधान मानावे लागू शकते. विशेष म्हणजे, कार्यकाळ संपणाऱ्या खासदारांमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश असल्याने, त्यांच्या जागेवर आता कोणाची वर्णी लागते किंवा मविआ आपली एकमेव जागा कोणाला देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यसभेसाठी आवश्यक असलेला ३७.५ मतांचा कोटा पूर्ण करणे हे विरोधकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

## राज्यातील ९ महानगरपालिकांना मिळाले महापौर

● पान १ वरून...

मताधिक्याने विजय मिळवला.

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपचे विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. शिवसेना आणि एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्याने कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला. जळगाव महानगरपालिकेत भाजपच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी निवड झाली असून शिवसेनेच्या मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. दीपमाला काळे यांनी जळगाव महापालिकेच्या १७व्या महापौर म्हणून पदभार स्वीकारला.

नागपूर महानगरपालिकेत भाजपच्या नीता ठाकरे यांनी १०४ मते मिळवत काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला. तर धुळे महानगरपालिकेत तिरंगी लढत झाली. या निवडणुकीत भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवून महापौरपदावर विजय मिळवला. राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेनेच्या संयुक्त उमेदवाराला केवळ १३ मते मिळाली. दुसरीकडे, नांदेड महानगरपालिकेत प्रथमच भाजपचा महापौर निवडून आला आहे. ८१ पैकी ४५ जागा जिंकून भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले असून महापौरपदासाठी कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. उपमहापौरपदासाठी दिपकसिंह रावत यांची निवड निश्चित झाली आहे.

### कोणत्या शहरात कोणाचा महापौर?

– सोलापूरमध्ये महापौरपदी विनायक कोंड्याल (भाजप) यांची निवड झाली असून उपमहापौर निवडीची प्रक्रिया सुरू आहे. जळगावमध्ये दीपमाला काळे (भाजप) महापौर तर मनोज चौधरी (शिवसेना) उपमहापौर, अहिल्यानगरमध्ये ज्योती गाडे (राष्ट्रवादी-एपी) महापौर तर धनंजय जाधव (भाजप) उपमहापौर, नागपूरमध्ये नीता ठाकरे (भाजप) महापौर असून उपमहापौरपदी लीला हाथीबेड यांची निवड झाली आहे. – धुळ्यात मायादेवी परदेशी (भाजप) महापौर आणि ज्योत्स्ना पाटील उपमहापौर, नाशिकमध्ये हीमगौरी आडके (भाजप) महापौर तर विलास शिंदे (शिवसेना) उपमहापौर, छत्रपती संभाजीनगरमध्ये समीर राजूरकर (भाजप) महापौर आणि राजेंद्र जंजाळ (शिवसेना-शिंदे) उपमहापौर पदी निवड झाली आहे. – पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे रवी लांडगे, तर उपमहापौरपदी शर्मिला बाबर (भाजप) यांची निवड झाली आहे. कोल्हापुरात रुपाराणी निकम (भाजप) महापौरपदी विराजमान झाल्या आहेत.

# चेन्नईमध्ये बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव, H5N1 विषाणूमुळे शेकडो कावळे मृत्युमुखी; सरकारकडून सूचना जारी

➤ चेन्नई : तामिळनाडूची राजधानी चेन्नईत बर्ड फ्लूचा इशारा देण्यात आला आहे. चेन्नईमध्ये शेकडो कावळे मृत आढळले आहेत. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये H5N1 विषाणू असल्याची माहिती समोर आली आहे.

चाचणीत कावळ्यांचा मृत्यू H5N1 म्हणजेच बर्ड फ्लूमुळे झाल्याचे म्हटले आहे. या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांनी सर्वसामान्यांसाठी एक सूचना जारी केली आहे. H5N1 विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी जैवसुरक्षा प्रोटोकॉलनुसार कावळे आणि कोंबड्यांचे सर्व मृतदेह जाळून टाकावेत किंवा खोल खड्ड्यात पुरावेत असे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

### सरकारने जारी केलेला सल्लागार

जनतेने मृत पक्षांना स्पर्श करणे किंवा त्यांना सांभाळणे टाळण्याचा सल्ला सरकारने मार्गदर्शक सूचनांमध्ये दिला आहे.


तसेच कोणत्याही नवीन प्रकरणांची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांना त्वरित देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. केंद्रीय पशुसंवर्धन मंत्रालयाने तामिळनाडूच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी तात्काळ लक्ष देण्याचे आवाहन केले आहे.

### H5N1 म्हणजे काय?

H5N1 हा इन्फ्लूएंझा A विषाणूचा एक अतिशय धोकादायक प्रकार आहे, जो प्रामुख्याने पक्षांना आणि वन्य पक्षांना संक्रमित करतो. याला सामान्यत: 'बर्ड फ्लू' म्हणून ओळखले जाते आणि ते पक्षांमध्ये वेगाने पसरू शकते. जरी H5N1 प्रामुख्याने पक्षांना होत असला तरीही तो कधीकधी मानवांना आणि इतर प्राण्यांना देखील संक्रमित करू शकतो.


### किती धोकादायक असू शकतो?

H5N1 विषाणू सामान्य लोकांसाठी खूप धोकादायक मानला जातो. हा विषाणू पक्षांमध्ये वेगाने




पसरतो. मानवांमध्ये संसर्ग दुर्मिळ आहे, परंतु जेव्हा होतो तेव्हा गंभीर असू शकतो. अनेक पुष्टी झालेल्या मानवी प्रकरणांमध्ये न्यूमोनियासारखे गंभीर श्वसन आजार आढळले आहेत.

## अवघ्या २ आठवड्यात मोडले सर्व मोठे रेकॉर्ड; जगभरात होते 'या' सिरीजची चर्चा..




➤ माजलगाव : प्रतिनिधी

बॉलीवूड अभिनेता इमरान हाशमी याच्या वेबसिरीजने सध्या सोशल मीडिया वर धुमाकूळ घातला आहे. २०२६ ची सुरूवात इमरानसाठी अत्यंय दमदार ठरली आहे. नेटफ्लिक्सवरील सलग दोन मोठ्या रिलीजमुळे त्याने ओटीटी प्लॅटफार्मवर ही धुमाकूळ घातला आहे.

'तस्करी : द स्मगलर्स वेब' या वेब सिरीजने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. गेल्या आठवड्यात ही सिरीज जगातील तब्बल २० देशांमध्ये नेटफ्लिक्सच्या टॉप १० नॉन-इंग्लिश शोजच्या यादीत ट्रेंड होत होती. विशेष म्हणजे यापैकी १० देशांमध्ये या सिरीजने थेट पहिला क्रमांक पटकावला असून, प्रेक्षकवर्गाने या सिरीजला भरभरून प्रतिसाद दिला आहे. 'तस्करी' या सीरिजने अवघ्या १२ दिवसांमध्ये अनेक मोठे रेकॉर्डस् मोडून काढले आहेत. रिलीजच्या पहिल्या दोन आठवड्यातच या सीरिजला तब्बल ५ कोटी ६ लाखांहून अधिक लोकांनी पाहिले आहे .नेटफ्लिक्सने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार १९ ते २५ जानेवारी २०२६ दरम्यान 'तस्करी'ने दुसऱ्या आठवड्यातही आपली मजबूत पकड कायम ठेवली आहे. या सीरिजला ३.९ मिलियन लोकांनी पाहिलं आहे.

नीरज पांडे आणि राघव जयरथ यांनी या सीरिजचे संयुक्त दिग्दर्शन केले आहे. कथानकाबरोबरच इमरान हाशमीच्या अभिनयाचे प्रेक्षकांकडून विशेष कौतुक होत आहे. त्यांनी साकारलेली भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. इमरानसोबतच या सीरिजमध्ये शरद केळकर, नंदीश सिंह संधू आणि अमृता खानविलकर यांसारखे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसतात. 'तस्करी'ला IMDb वर ७.२ अशी चांगली रेटिंग मिळाली आहे.

## म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाढदिवस साजरा करणार नाही

➤ माजलगाव : प्रतिनिधी



मुंबई : 'राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने साऱ्या महाराष्ट्रावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळेच यंदा ९ फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.


कार्यकर्ते, पक्षनेते, पदाधिकारी आणि नागरिकांनाही पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत, शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज लावू नये, तसेच वाढदिवसानिमित्ताने कोणताही सोहळा आयोजित करू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे. 'अजित पवार यांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र आजही सावरलेला नाही. व्यक्तिश: मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. अजित पवार यांच्या निधनाने झालेली अपरिमित हानी भरून येणारी नाही. पवार कुटुंबाच्या दु:खात आपण सहभागी आहोत.

अशा या दु:खद परिस्थितीत वाढदिवस साजरा करणे, सोहळे-समारंभ करणे मला उचित वाटत नाही. त्यामुळेच परिस्थितीचा गांभीर्य आपण जपू या असे आवाहन शिंदे यांनी केले आहे. माझ्या वाढदिवसानिमित्ताने कुणीही पुष्पगुच्छ आणू नयेत, होर्डिंग्स लावू नयेत, तसेच कोणताही समारंभ, कार्यक्रम आयोजित करू नयेत', अशी विनंती शिंदे यांनी केली आहे.

## रिझर्व्ह बँकेचा मोठा निर्णय, रेपो रेटचा दर कायम; कर्जदारांना दिलासा नाही

मुंबई : रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये कोणताही बदल केलेला नाही. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी रेपो रेट ५.२५ टक्के स्थिर ठेवण्याची घोषणा केली. आरबीआयच्या या निर्णयामुळे कर्जांवरील व्याजदरही तसेच राहतील आणि ग्राहकांना कोणताही दिलासा मिळणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने तटस्थ राहून आपली भूमिका कायम ठेवली आहे. म्हणजेच गरज पडल्यास आरबीआय भविष्यात व्याजदर कमी करण्यास किंवा वाढविण्यास तयार आहे. संजय मल्होत्रा म्हणाले की, अमेरिकेसोबतच्या व्यापार करारामुळे भारताच्या निर्यातीला मोठी चालना मिळेल .पुढे बोलताना आरबीआय गव्हर्नर म्हणाले की, भारत अजूनही एफडीआयसाठी पसंतीचे ठिकाण आहे. भारताची अर्थव्यवस्था आणि वाढ सध्या मजबूत स्थितीत आहे. देशाची जीडीपी वाढ ७.४ टक्के होण्याच्या मार्गावर आहे .महागाई अजूनही नियंत्रणातसंजय मल्होत्रा यांनी सांगितले की, देशातील महागाई नियंत्रणात आहे.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | ल्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

## विशेष

# तिरंगा कप ओपन कराटे चॅम्पियनशिपमध्ये माजलगावच्या कराटेपटूंनी घवघवीत यश; सुवर्ण-रौप्य-कांस्य पदकांची लयलूट




➤ माजलगाव : प्रतिनिधी

संभाजीनगर येथे पार पडलेल्या तिरंगा कप ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत माजलगावच्या कराटेपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेत कराटे मार्शल आर्ट असोसिएशनने एकूण तिसरे स्थान पटकावून मोठे यश संपादन केले.

स्पर्धेत खालील खेळाडूंनी पदकांची कमाई केली —

आयांश देशपांडे – रौप्य पदक
भार्गव पाठक – रौप्य पदक
यशना वावळकर – सुवर्ण व रौप्य पदक
श्रुती सिरसेवार – सुवर्ण पदक
जानवी उगले – रौप्य पदक
अस्मिता मोगरे – सुवर्ण पदक
अलीजा शेख – रौप्य पदक
दिव्यांका हिरवे – दोन सुवर्ण पदके
सदिच्छा गायकवाड – सुवर्ण पदक
हर्षद बागुल – कांस्य पदक
वैजनाथ सानप – रौप्य पदक
सौरभ कांबळे – रौप्य पदक
सोहम जाधव – सुवर्ण व रौप्य पदक
अवनी कुलकर्णी – सुवर्ण व कांस्य पदक
सार्थक डोंगरे (सर) – सुवर्ण पदक
अभिजीत राठोड (सर) – सुवर्ण पदक

**माजलगावच्या कराटेपटूंनी उल्लेखनीय कामगिरी**

या सर्व खेळाडूंनी फाईट व काता या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत माजलगाव शहराचा गौरव वाढवला. या यशाबद्दल माजलगावचे आमदार आदरणीय प्रकाशदादा सोळंके तसेच जयसिंग भैय्या सोळंके यांनी सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. गेल्या अनेक वर्षांपासून माजलगाव शहरात सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे कराटे प्रशिक्षण वर्ग नियमितपणे सुरू असून, विशेषत: आजच्या काळात मुलींच्या स्वसंरक्षणासाठी कराटेचे महत्त्व अधिक वाढले आहे. त्यामुळे माजलगावकरांनी आपल्या मुला-मुलींना या प्रशिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन एकदा तरी सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील कराटे वर्गास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शोकाकुल वातावरणात दिवंगत अजितदादांच्या अस्थींचे मंजरथ येथे विसर्जन

## माजलगाव मतदारसंघातून अस्थिकलश यात्रा; आ. प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या हस्ते विधी





➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडले. यानिमित्त माजलगाव मतदारसंघातून काढण्यात आलेली अस्थिकलश यात्रा दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

अस्थिकलश यात्रेच्या समारोपानंतर आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या हस्ते धार्मिक विधीपूर्वक अस्थींचे विसर्जन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांनी दिवंगत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अस्थिकलश यात्रेदरम्यान संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण होते. "अजितदादा अमर रहें" अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. दिवंगत नेत्याच्या सामाजिक व राजकीय कार्याची उपस्थितांनी आठवण करून देत त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली.

या विधीप्रसंगी विविध राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नेते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजस्थानी विद्यालयात बाल महोत्सवाचा रंगतदार; स्नेहसंमेलन उत्साहात

## ➤ विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मंच; सायबर जनजागृती नाटिकेने वेधले लक्ष






➤ माजलगाव : प्रतिनिधी

येथील राजस्थानी विद्यालयात दि. ३ व ४ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन (बाल महोत्सव) अत्यंत आनंदोत्सवाच्या वातावरणात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष, उद्घाटक, प्रमुख पाहुणे व मुख्याध्यापक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त व आत्मविश्वास याबाबत उपस्थितांनी विशेष कौतुक व्यक्त केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. त्यानंतर लेझीम मनोरे, शिवतांडव, देशभक्तीपर गीत, लावणी, गोंधळ व पोवाडा अशा विविध लोककला व नृत्यप्रकारांनी रंगत आणली. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थित प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त टाळ्यांची दाद मिळाली.

आदर्श गुरुकुल येथील विद्यार्थ्यांनी केशव बादाडे सरांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या जनजागृतीपर नाटिकेने विशेष लक्ष वेधून घेतले. या नाटिकेतून ऑनलाइन गेम्स, ऑनलाइन रमी, ऑनलाइन कर्ज देणाऱ्या ॲप्स, माहिती व डेटाबेस चोरी, सायबर फसवणूक, फसवे फोन कॉल्स व सायबर गुन्हेगारी याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली.

**ठळक मुद्दे :**
● दोन दिवसीय बाल महोत्सव उत्साहात संपन्न ● विविध लोककला व नृत्यप्रकारांचे सादरीकरण ● सायबर गुन्हेगारीविषयी प्रभावी जनजागृती नाटिका ● विद्यार्थी-पालकांची मोठी उपस्थिती

तसेच आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी गीतांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख, देशभक्तीची भावना, 'मराठी शाळा वाचवा' अशा विविध आशयांतून आपले कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. आर. जी. बजाज, उद्घाटक डॉ. सुरेशजी साबळे, प्रमुख उपस्थितीत ग्रामीण कथाकार रामदीपजी डाके, सय्यद रफिक, सौ. सोनाली अनभुले, रामानंदजी लड्डा, ओमप्रकाशजी मानधने, प्रमुख पाहुणे सौ. सुलोचना प्रधान, सौ. संगीताजी झंवर, चंद्रशेखर हाडूळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास मार्गदर्शन माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सारिका तौर, स्नेहसंमेलन प्रमुख पांडुरंग होके, नागकन्या घुसे, रेणुका जोशी यांनी केले.

स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्याचा प्रेरणादायी आदर्श

## पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा वाढदिवस अन्नदान, शैक्षणिक साहित्य व फळ वाटपाने साजरा

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत समाजातील गरजू घटकांना मदत करून आनंद द्विगुणीत करण्याचा अनोखा व प्रेरणादायी उपक्रम पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी राबविला. वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा क्षण न राहता समाजासाठी उपयोगी ठरावा, या भावनेतून त्यांनी आपला ३५ वा वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा केला.

● **या उपक्रमांतर्गत :**
● गोविंदपूर येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप,
● माजलगाव येथील मूकबधिर शाळेत विद्यार्थ्यांना खिचडीचे अन्नदान,
● तसेच ग्रामीण रुग्णालय, माजलगाव येथे रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

विशेष म्हणजे, वाढदिवसानिमित्त केक कापणे, सत्कार, शाल व फुलांचे हार टाळून समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्यात आले. हा उपक्रम माजलगावमधील पत्रकार बांधव व मित्रपरिवाराच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.




### मित्रपरिवार व मान्यवरांचा सहभाग

● या सामाजिक उपक्रमासाठी मोलाचे योगदान देणाऱ्यांमध्ये नगरसेवक सय्यद रफिक, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे, ॲड. राम गवते, उपसरपंच शाम पांचाळ, सोनवणे सर, पत्रकार परमेश्वर सोळंके, विष्णू उगले, अरविंद ओव्हाळ, पृथ्वीराज निर्मळ, राम यादव, इम्रान शेख यांच्यासह अनेक मित्रांनी परिश्रम घेतले.

● **ठळक मुद्दे :**
● वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा
● केक, फटाके व डीजे खर्चाला फाटा
● विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप
● मूकबधिर शाळेत अन्नदान
● ग्रामीण रुग्णालयात फळ वाटप
समाजाला सकारात्मक संदेश देणारा उपक्रम

● **समाजासाठी संदेश :**

● सध्या सर्वत्र वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरे करण्याची स्पर्धा सुरू आहे. अतिरेकी सजावट, फटाके, डीजे यावर मोठा खर्च केला जातो. मात्र सामाजिक भान ठेवून समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचे प्रमाण कमी होत चालले आहे.

● "माझा प्रत्येक वाढदिवस समाजासाठी उपयोगी ठरावा, यासाठी मी प्रयत्नशील आहे. आपणही आपला वाढदिवस सामाजिक कार्यातून साजरा करावा," असे आवाहन पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी यावेळी केले.




## दिंद्रुडच्या ज्ञानदीप अबॅकस अकॅडमीचा दबदबा

➤ डी गटात १५६ सेकंदांत १०० गुण; मराठवाड्यासह चार विभागांतील स्पर्धकांचा सहभाग

# १२ वी प्रादेशिक व राज्यस्तरीय ऑनलाइन अबॅकस स्पर्धेत उज्ज्वल गितेचा विक्रम

➤ माजलगाव : प्रतिनिधी

१२ वी प्रादेशिक व राज्यस्तरीय ऑनलाइन अबॅकस स्पर्धा रविवार, दि. २६ जानेवारी रोजी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र या चारही विभागांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धा ग्रुप ए, बी, सी, डी, ई व एफ अशा एकूण सहा गटांमध्ये घेण्यात आली.

या स्पर्धेत १०० गणिती प्रश्न सोडवण्यासाठी १२ मिनिटांचा कालावधी देण्यात आला होता. कमीत कमी वेळेत १०० पैकी १०० गुण मिळवणारा स्पर्धक विजेता ठरतो, असे या स्पर्धेचे स्वरूप होते.

डी गटात सहभागी झालेला ज्ञानदीप अबॅकस अकॅडमी, दिंद्रुड येथील ११ वर्षीय विद्यार्थी उज्ज्वल बाबुराव गिते याने अवघ्या २ मिनिटे ३६ सेकंदांत १०० पैकी १०० गुण मिळवून तब्बल ९ मिनिटे २४ सेकंद वेळ शिल्लक ठेवत या स्पर्धेतील सर्वात वेगवान विजेता ठरण्याचा मान मिळवला.



उज्ज्वल गिते याने यापूर्वीही सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २०२३ सोलापूर येथे झालेल्या ९ व्या प्रादेशिक अबॅकस स्पर्धेत ए गटात ६ मिनिटांत २०६ प्रश्न सोडवून नवा विक्रम प्रस्थापित केला.

२०२४ नांदेड येथील १० व्या प्रादेशिक स्पर्धेत बी गटात ६ मिनिटांत २०३ प्रश्न सोडवून विजय मिळवला. २०२५ नांदेड येथील ११ व्या स्पर्धेत सी गटात २ मिनिटे ५० सेकंदांत १०० पैकी १०० गुण मिळवत नवा विक्रम केला. नुकत्याच पार पडलेल्या १२ व्या राज्यस्तरीय ऑनलाइन अबॅकस स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, डी गटात उज्ज्वल गिते याने १५६ सेकंदांत १०० पैकी १०० गुण मिळवत मागील वर्षीचा स्वत:चा १७० सेकंदांचा विक्रम मोडून प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत ए गटात एकलव्य बाबुराव गिते याने १८६ सेकंदांत १०० गुण मिळवून राज्यात तृतीय क्रमांक,

● **बी गटात गजानन सतीश तिडके (चौथा) व श्रावणी कैलास दराडे (पाचवा),**
सी गटात सुनिता मधुकर वखरे हिने चौथा क्रमांक मिळवून यश संपादन केले.

प्राध्यापक बाबुराव गिते यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानदीप अबॅकस अकॅडमी, दिंद्रुड येथील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

त्यामध्ये शितल रघुनाथ करनर, अनन्या वैभव पासंगे, सृष्टी विलास कांदे, अदिती प्रल्हाद शिंदे, मुक्ताई भारत डोंगरे, गीता गोरख बडे, रितेश गोरख बडे, शिवम कैलास दराडे, शुभम सुग्रीव तिडके, रामेश्वर बळीराम तिडके, तुकाराम बळीराम तिडके, आयुष राजेंद्र मुसळे, हरिओम सुनैना मुसळे, प्रताप रवी नाईकनवरे, विनीत अशोक तिडके, अभिजीत महादेव मुंडे, अभिषेक महादेव मुंडे, यशराज भगवान गरड आदी विद्यार्थ्यांनीही दैदीप्यमान कामगिरी करत अकॅडमीचा नावलौकिक वाढवला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ज्ञानदीप अबॅकस अकॅडमी, दिंद्रुड कडून प्राध्यापक बाबुराव गिते यांनी अभिनंदन केले.